8/22/24, 6:26 PM Screenshot_20240705_100548_Microsoft 365 (Office) - Mugdha Rajankar.jpg

UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Special Issue : Volume - 10 : Issue-1 (January-2024)
ISSN 2455-4375

# नविन शैक्षणिक धोरण २०२० आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमातील बदल

**मुग्धा मनिष राजनकर**
संशोधक
रा. तु. म. ना. विद्यापीठ, नागपूर
मो. नं. ९४२३६८८८४८
Email Id - mugdharajankar@gmail.com

**डॉ. शालिनी फुलमाळी**
मार्गदर्शक
भालेराव विज्ञान महाविद्यालय सावनेर, जि. नागपूर
मो. नं.९४२२३०७११०
Email Id-drshalinifulmali958@gmail.com

---

**सारांश :**

*जुन्या बाबीमध्ये बदल घडवून नविन बाबींचा स्विकार करणे आणि त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे हेच खरे विकासाचे ध्येय. कारण कोणत्याही बाबतीत बदलत्या परीप्रेक्षानुसार बदल होणे आवश्यक आहे. आज ग्रंथालय हे पुस्तकापुरते मर्यादित राहिलेले नाही. त्यामुळे ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा शिरकाव, वाचकांचा ई – स्त्रोतांकडे वाढता कल लक्षात घेता नविन शैक्षणिक धोरणातंर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी ते आचार्य पदवी पर्यंत सर्वत्र बदल करण्यात आले आहेत. त्याच अनुषंगाने प्रस्तुत संशोधन लेख सादर करीत आहे.*

**कि वर्ड :** नविन शैक्षणिक धोरण २०२०, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र

---

**प्रस्तावना :**

भारतात शैक्षणिक क्षेत्रात नविन शैक्षणिक धोरण २०२० लागू झालेले आहे किंवा लागू होणार आहे, हा आज सर्वत्र एक चर्चेचा विषय झालेला आहे. नविन शैक्षणिक धोरण २०२० यात काय आहे कि ज्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात बदल घडून येणार आहेत, प्रत्यक्षात अंमलबजावणी कधी पासून सुरु होणार, असे अनेक प्रश्न सर्वांसमोर उभे आहेत. नविन शैक्षणिक धोरण २०२० अतंर्गत वर्ग पहिली ते आचार्य पदवी स्तरापर्यत सर्वच शैक्षणिक स्तरावरील अभ्यासक्रमात असा बदल घडवून आणलेला आहे कि यात सर्वांना आपल्या आवडीचा विषय निवडण्याची मुभा राहणार आहे, त्याचप्रमाणे भाषेची मर्यादा दूर करण्यात आलेली आहे. बहुशाखीय अभ्यासक्रमाला प्राधान्य देण्यात आले आहे. असे जरी असले तरी या नियमावलीची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विद्यापीठ अनुदान आयोगांतर्गत प्रत्येक विद्यापीठाला दिली आहे. प्रत्येक विद्यापीठाकडे त्यांच्या अभ्यासक्रमात बदल करण्याचे हक्क दिले आहे. या बदलांचा विचार करता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठातील आतंरविद्याशाखेय विभागातील एक महत्वाचा विषय म्हणजे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र होय. या विषयाला देखील नविन शैक्षणिक धोरण २०२० लागू झालेले आहे व त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र (सी. बी. सी. एस.) दोन वर्षीय पदव्यूत्तर स्तरावर २०२३ – २०२४ या वर्षापासून सुरु करण्यात आली आहे तर पदवी स्तरावरील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयावरील एक वर्षीय (सी. बी. सी. एस.) पदवी अभ्यासक्रमाकरीता २०२४ – २०२५ या वर्षापासून लागू करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पदवी स्तरावरील इतर शैक्षणिक शाखा जसे कला, वाणिज्य, विज्ञान अश्या पारंपारीक अभ्यासक्रमात देखील एक निवडक विषय म्हणून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये

https://drive.google.com/file/d/1LJy3HzzDg0iHOmnGEfZ0qrqEXbKXSKD0/view 1/1